दिनांक 23/06/2023 रोजीचा प्रशासकीय ठराव क्र.19

विषय – विटा नगरपरिषदेचे सन 2020-2021 व 2021-2022 या वर्षाचे लेखापरिक्षण स्थानिक निधी लेखापरिक्षा, सांगली यांचेकडून दि.11/05/2023 रोजी लेखापरिक्षण अहवाल प्राप्त झाला आहे. त्यास मान्यता देणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ – मा.मुख्याधिकारी यांनी लेखापरिक्षक यांची दि.12/06/2023 रोजी मंजुर केलेली टिपणी.

विटा नगरपरिषदेचे सन 2020-2021 व 2021-2022 या वर्षाचे लेखापरिक्षण स्थानिक निधी लेखापरिक्षा, सांगली यांचेकडून झाले असून त्याचा अहवाल दि.11/05/2023 रोजी प्राप्त झाला आहे. मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम 1930 चे कलम 10 (1) प्रमाणे सदरच्या लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेत आहे. सदर लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेदांची पुर्तता करणे कामी अनुपालन अहवाल पाठविणे बाबत कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 23/06/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 20

विषय – विटा नगरपरिषद आरोग्य विभागाकडील घंटागाडी क्रमांक एम.एच.10.पी.213 ची दुरूस्ती करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी वाहन व्यवस्थापक यांची दिनांक 16/06/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगरपरिषद आरोग्य विभागाकडील घंटागाडी क्रमांक एम.एच.10.पी.213 हे वाहन दि.25/01/2017 रोजी खरेदी करण्यात आलेले असून सदर घंटागाडीचा वापर अत्यावश्यक सेवेतील आरोग्य विभागाकडे कचरा संकलनासाठी करण्यात येतो. सदर वाहन खरेदी करून 6 वर्षे झालेली असून सदर वाहनाची यापूर्वी कुठेही कोणतीही मोठी दुरुस्ती निघालेली नव्हती. सद्यस्थितीला सदर वाहनाचे इंजिनची दुरुस्ती निघालेली असून ती दुरुस्ती सत्वर करून घेणे आवश्यक आहे. अन्यथा शहरातील कचरा उठाव करण्यावर परिणाम होणार आहे. तरी सदर घंटागाडी क्रमांक एम.एच.10.पी.213 ची दुरूस्ती शहरातील अधिकृत डिलर यांचेकडून करणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 23/06/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 21

विषय – विटा नगरपरिषद वाहन विभागाकडील लहान पाणी टँकरची दुरूस्ती करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी वाहन व्यवस्थापक यांची दिनांक 16/06/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगरपरिषद वाहन विभागाकडे शहरामध्ये विविध धार्मिक कार्ये, मयतकार्ये तसेच इतर कार्यक्रमकामी 5 लहान पाणी टँकर आहेत. सदरचे पाणी टँकर जुने झाले असल्याने त्याची दुरूस्ती करणे आवश्यक आहे. सदर दुरूस्तीमध्ये टँकर वेल्डींग करणे, गंज प्रतिबंध कलर आतून करणे, बाहेरून कलर करणे, लेटरींग करणे, मेन व्हॉल्व बसविणे, प्रत्येक टँकरला दोन चाव्या बसविणे इत्यादी अनुषंगीक कामे करणे आवश्यक आहे. सदरचे पाणी टँकर विविध कार्यक्रमकामी वापरात येत असलेने त्याची दुरुस्ती सत्वर करून घेणे आवश्यक आहे. तरी नगरपरिषद वाहन विभागाकडील 5 लहान पाणी टँकर दुरूस्ती करणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 23/06/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 22

विषय – विटा नगरपरिषदेसाठी स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत चार चाकी ऑटो टीपर नग- 4 खरेदी करणेकामी दाखल निविदावर निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी सहा.भांडार पर्यवेक्षक यांची दिनांक 08/06/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगरपरिषदेसाठी स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत चार चाकी ऑटो टीपर नग- 4 खरेदी करणेकामी Bid Number GEM/2023/B/3467110 दिनांक 19/05/2023 ने GEM पोर्टलवर खालील ई निविदा दाखल आहेत.

1) सत्यम इंटरप्राईजेस रक्कम रूपये 39,98,000/-
2) फिनीक्स इनविरोटेक इंजिनिअरींग रक्कम रूपये 44,00,000/-
3) श्री. इंटरप्राईजेस रक्कम रूपये 48,00,000/-

उपरोक्त ई निविदापैकी सत्यम इंटरप्राईजेस यांचे निविदेतील दर सर्वात कमी आहेत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2013 मधील तरतूदीनूसार सर्वात कमी दराची निविदा मंजूर करीत आहे. याकामी रितसर करारपत्र करून कार्यारंभ आदेश देणेत यावा. तसेच नामंजूर टेंडर बयाणा रक्कम अदा करणेस मंजूरी देत आहे .

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 23/06/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 23

विषय – विटा नगरपरिषदेसाठी स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत तीन चाकी ऑटो टीपर नग- 2 खरेदी करणेकामी दाखल निविदावर निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी सहा.भांडार पर्यवेक्षक यांची दिनांक 08/06/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगरपरिषदेसाठी स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत तीन चाकी ऑटो टीपर नग- 2 खरेदी करणेकामी Bid Number GEM/2023/B/3468330 दिनांक 19/05/2023 ने GEM पोर्टलवर खालील ई निविदा दाखल आहेत.

| | |
|---|---|
| 1) सत्यम इंटरप्राईजेस | रक्कम रूपये 9,98,600/- |
| 2) फिनीक्स इनविरोटेक इंजिनिअरींग | रक्कम रूपये 10,20,000/- |
| 3) श्री. इंटरप्राईजेस | रक्कम रूपये 11,00,000/- |

उपरोक्त ई निविदापैकी सत्यम इंटरप्राईजेस यांचे निविदेतील दर सर्वात कमी आहेत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2013 मधील तरतूदीनूसार सर्वात कमी दराची निविदा मंजूर करीत आहे. याकामी रितसर करारपत्र करून कार्यारंभ आदेश देणेत यावा. तसेच नामंजूर टेंडर बयाणा रक्कम अदा करणेस मंजूरी देत आहे.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 23/06/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 24

विषय – विटा नगरपरिषदेसाठी स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत ट्रॅक्टर नग- 2 खरेदी करणेकामी दाखल निविदावर निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी सहा.भांडार पर्यवेक्षक यांची दिनांक 08/06/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगरपरिषदेसाठी स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत ट्रॅक्टर नग- 2 खरेदी करणेकामी Bid Number GEM/2023/B/3449457 दिनांक 15/05/2023 ने GEM पोर्टलवर खालील ई निविदा दाखल आहेत.

| | |
|---|---|
| 1) दर्शन ट्रॅक्टर्स | रक्कम रूपये 7,59,968/- |
| 2) चोपडा व्हील्स | रक्कम रूपये 8,20,000/- |
| 3) श्री. महालक्ष्मी ट्रॅक्टर्स | रक्कम रूपये 8,30,400/- |

उपरोक्त ई निविदापैकी दर्शन ट्रॅक्टर्स यांचे निविदेतील दर सर्वात कमी आहेत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2013 मधील तरतूदीनूसार सर्वात कमी दराची निविदा मंजूर करीत आहे. याकामी रितसर करारपत्र करून कार्यारंभ आदेश देणेत यावा. तसेच नामंजूर टेंडर बयाणा रक्कम अदा करणेस मंजूरी देत आहे .

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 23/06/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 25

विषय – विटा नगरपरिषदेसाठी स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत 24 हॅन्ड कार्ट खरेदी करणेकामी दाखल निविदावर निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी सहा.भांडार पर्यवेक्षक यांची दिनांक 08/06/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगरपरिषदेसाठी स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत 24 हॅन्ड कार्ट खरेदी करणेकामी Bid Number 511687795321543 दिनांक 31/05/2023 ने GEM पोर्टलवर खालील ई निविदा दाखल आहेत.

1)ALFLAH Nominal Capacity 360 Liters (Two Wheel Type Wheel Barrow) Segregation Cart रक्कम रूपये 2,30,160/-

2)IENVIROTECH Nominal Capacity 360 Liters (Two Wheel Type Wheel Barrow) Segregation Cart रक्कम रूपये 4,80,000/-

3)SANDS Nominal Capacity 360 Liters (Two Wheel Type Wheel Barrow) Segregation Cart रक्कम रूपये 2,64,000/-

उपरोक्त ई निविदापैकी ALFLAH Nominal Capacity 360 Liters (Two Wheel Type Wheel Barrow)Segregation Cart यांचे रिसेलर i-smart techno solutions vita यांचे निविदेतील दर सर्वात कमी आहेत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2013 मधील तरतूदीनूसार सर्वात कमी दराची निविदा मंजूर करीत आहे. याकामी रितसर करारपत्र करून कार्यारंभ आदेश देणेत यावा. तसेच नामंजूर टेंडर बयाणा रक्कम अदा करणेस मंजूरी देत आहे .

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 23/06/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 26

विषय – विटा नगरपरिषदेसाठी स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत बेलिंग मशीन नग- 2 खरेदी करणेकामी दाखल निविदावर निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी सहा.भांडार पर्यवेक्षक यांची दिनांक 08/06/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगरपरिषदेसाठी स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत बेलिंग मशीन नग- 2 खरेदी करणेकामी Bid Number GEM/2023/B/3453464 दिनांक 16/05/2023 ने GEM पोर्टलवर खालील ई निविदा दाखल आहेत.

1) आय स्मार्ट टेक्नो सोल्युशन्स रक्कम रूपये 8,00,000/-
2) श्री.समर्थ ट्रेडर्स रक्कम रूपये 10,00,000/-
3) प्रविन रामचंद्र बेलवले रक्कम रूपये 9,00,000/-

उपरोक्त ई निविदापैकी आय स्मार्ट टेक्नो सोल्युशन्स यांचे निविदेतील दर सर्वात कमी आहेत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2013 मधील तरतूदीनूसार सर्वात कमी दराची निविदा मंजूर करीत आहे. याकामी रितसर करारपत्र करून कार्यारंभ आदेश देणेत यावा. तसेच नामंजूर टेंडर बयाणा रक्कम अदा करणेस मंजूरी देत आहे.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 23/06/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 27

विषय – विटा नगरपरिषदेसाठी स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत फिरते शौचालय नग- 2 खरेदी करणेकामी दाखल निविदावर निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी सहा.भांडार पर्यवेक्षक यांची दिनांक 08/06/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगरपरिषदेसाठी स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत फिरते शौचालय नग- 2 खरेदी करणेकामी Bid Number GEM/2023/B/3354423 दिनांक 13/04/2023 ने GEM पोर्टलवर खालील ई निविदा दाखल आहेत.

| | |
|---|---|
| 1) आय स्मार्ट टेक्नो सोल्युशन्स | रक्कम रूपये 13,99,400/- |
| 2) एस के वॉटर इंजिनिअरिंग | रक्कम रूपये 15,00,000/- |
| 3) गोविंदराज इंटरप्रायजेस | रक्कम रूपये 15,50,000/- |

उपरोक्त ई निविदापैकी आय स्मार्ट टेक्नो सोल्युशन्स यांचे निविदेतील दर सर्वात कमी आहेत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2013 मधील तरतूदीनूसार सर्वात कमी दराची निविदा मंजूर करीत आहे. याकामी रितसर करारपत्र करून कार्यारंभ आदेश देणेत यावा. तसेच नामंजूर टेंडर बयाणा रक्कम अदा करणेस मंजूरी देत आहे.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 23/06/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 28

विषय – विटा नगरपरिषदेकडील सन 2023-2024 या वित्तीय वर्षाकरीता विदयुत विभागसाठी इलेक्ट्रीक साहित्य खरेदी करणेकामी दाखल ई निविदावर निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी विदयुत अभियंता यांची दिनांक 14/06/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगरपरिषदेकडील सन 2023-2024 या वित्तीय वर्षाकरीता विदयुत विभागसाठी इलेक्ट्रीक साहित्य खरेदी करणेकामी खालील ई निविदा दाखल आहेत.

1) मलिक इलेक्ट्रीकल्स रक्कम रूपये 3,79,286.22/-

2) इप्सीत इंटरप्राईजेस रक्कम रूपये 3,86,408.70/-

3) स्टेशनरी बॉटरी सर्व्हिस सेंटर रक्कम रूपये 3,91,034.30/-

उपरोक्त ई निविदापैकी मलिक इलेक्ट्रीकल्स यांचे निविदेतील दर सर्व प्रकारात सर्वात कमी आहेत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2013 मधील तरतूदीनूसार सर्वात कमी दराची निविदा मंजूर करीत आहे. याकामी रितसर करारपत्र करून कार्यारंभ आदेश देणेत यावा. तसेच नामंजूर टेंडर बयाणा रक्कम अदा करणेस मंजूरी देत आहे.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 23/06/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 29

विषय – विटा नगरपरिषदेकडील सन 2023-2024 या वित्तीय वर्षाकरीता स्ट्रीट लाईटसाठी नवीन पोल उभा करणे, रस्त्यावरील पोल शिफ्ट करणे व वायर ओढणेकामी दाखल ई निविदावर निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी विदयुत अंभियंता यांची दिनांक 13/06/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगरपरिषदेकडील सन 2023-2024 या वित्तीय वर्षाकरीता स्ट्रीट लाईटसाठी नवीन पोल उभा करणे, रस्त्यावरील पोल शिफ्ट करणे व वायर ओढणेकामी खालील ई निविदा दाखल आहेत.

1) स्टेशनरी बॉटरी सर्व्हिस सेंटर — रक्कम रूपये 1,80,304/-

2) मलिक इलेक्ट्रीकल्स — रक्कम रूपये 1,81,720/-

3) इप्सीत इंटरप्राईजेस — रक्कम रूपये 1,83,136/-

उपरोक्त ई निविदापैकी स्टेशनरी बॉटरी सर्व्हिस सेंटर यांचे निविदेतील दर सर्व प्रकारात सर्वात कमी आहेत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2013 मधील तरतूदीनूसार सर्वात कमी दराची निविदा मंजूर करीत आहे. याकामी रितसर करारपत्र करून कार्यारंभ आदेश देणेत यावा. तसेच नामंजूर टेंडर बयाणा रक्कम अदा करणेस मंजूरी देत आहे.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक - 23/06/2023 रोजीचा प्रशासकीय ठराव क्र. 30

विषय – प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी योजनेअंतर्गत "स्वनिधी से समृद्धी" कार्यक्रम राबवणे तसेच कर्ज प्राप्त लाभार्थ्यांचे socio-economic profiling करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ – मा.मुख्याधिकारी यांनी कर निरीक्षक यांची दि. 19/06/2023 रोजी मंजुर केलेली टिपणी.

केंद्र शासन पुरस्कृत प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी (PM SVA Nidhi) योजनेअंतर्गत “स्वनिधी से समृद्धी” कार्यक्रम राज्यात राबवण्यात येत असून या अंतर्गत पथविक्रेता योजनेच्या लाभार्थ्यांच्या कुटुंबियांचे सर्वेक्षण करून त्यांची पात्रता तपासून त्यांना शासनाच्या इतर योजनेचा फायदा मिळवून देण्याची योजने आहे. “स्वनिधी से समृद्धी” ही योजना प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी योजनेचा घटक असेल. या योजनेसाठी तृतीय टप्प्यांमध्ये विटा शहराचा समावेश केला असून नगरपरिषदेने विविध बँका मार्फत जवळपास 406 पथविक्रेत्यांना पीएम स्वनिधीचे प्रथम 10,000/- रुपयांचे कर्ज उपलब्ध करून दिले आहे. पीएम स्वनिधीच्या सर्व लाभार्थ्यांचे सामाजिक,आर्थिक सर्वेक्षण करून केंद्र शासनाच्या 8 योजनांसाठी त्यांची व त्यांच्या कुटुंबीयांची पात्रता तपासणी तसेच जिथे राज्य शासनाला योग्य वाटेल तिथे राज्य शासनाच्या विविध सामाजिक, आर्थिक कल्याण योजनांचे समावेशन करता येईल. हा या योजनेचा मुख्य उद्देश असल्याने योजने अंतर्गत लाभार्थ्यांचे सर्वेक्षण करणे तसेच योजनेची व्यापक प्रचार व प्रसिद्धी करून प्रभावी अंमलबजावणी करणे अपेक्षित आहे. सर्वेक्षणाचे काम बाह्य यंत्रणेमार्फत विहित अटींच्या अधीन राहून देखील करता येणे शक्य आहे. त्यासाठी केंद्र शासनाच्या (MoHUA) कडून K-12012/4/2020- PM SVA Nidhi दि.23/10/2022 रोजीच्या पत्रानुसार मंजुर यादीतील अ.क्रं.872 ला विटा नगरपरिषदेला पीएम स्वनिधी योजनेअंतर्गत socio-economic profiling या घटकाकरीता 5,00,000/- (पाच लक्ष रुपये) इतका निधी प्राप्त झाला असून यासाठी लाभार्थ्यांचे सर्वेक्षण करणे, प्रोफाईलिंग करणे, योजनेची प्रसिध्दी करणे तसेच इतर अनुषंगिक खर्चास मंजुरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा